www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १४१ वा मंगळवार दि. ०४ फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# सह संपादक मुकुंद कांबळे यांना साने गुरजी राष्ट्र प्रेरणा पुरस्काराने सन्मानित



**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी-**नुकतेच साने गुरुजी जयंती निमित्त परेल मुंबई येथे रविवार दिनांक 2 फेब्रुवारी रोजी सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती ( महाराष्ट्र राज्य),च्या वतीने विशेष उल्लेखनिय कार्याचा व सेवेचा गौरव म्हणून दैनिक युवक आधारचे सह संपादक मुकुंद कांबळे यांना साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार मुंबई विद्यापीठाचे *मा.कुलगुरु तथा माजी खासदार डॉ भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते मुंबई येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. मुकुंद कांबळे यांचे सर्व स्तरात कौतुक होते आहे.

# क्रिकेट सामन्यांचे शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल :वार्ताहर**–स्वर्गीय रघुनाथ शेठ जितेकर व सरपंच चषक दापोली यांच्या वतीने मर्यादित षटकांचे आयोजन करण्यात आले आहे. या सामन्यांचे उद्घाटन शेतकरी कामगार पक्षाचे नेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.ग्रामीण भागात क्रिकेटचे सामने मोठ्या प्रमाणात खेळवले जातात यातूनच भविष्यात आपल्या विभागातून तरुण पिढी नक्कीच निर्माण होईल. उत्तम दर्जाचे आयोजन येथे येणाऱ्या सर्व क्रीडा प्रेमींना या सामन्यादरम्यान पाहता येईल याची मला खात्री आहे. असे प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले. दापोलीच्या सर्व सभासदांना तसेच खेळण्यासाठी आलेल्या सर्व टीमला यावेळी प्रीतम म्हात्रे यांनी शुभेच्छा दिल्या.यावेळी प्रीतम म्हात्रे यांच्या सोबत प्रकाशशेठ जितेकर, श्री. मोतीराम जितेकर, श्री. समाधान घोपरकर, श्री. पंकलेश डाऊर, श्री. अमोल जितेकर, श्री. सचिन जितेकर, श्री. अनुज जितेकर, श्री. सौरभ जितेकर, श्री. प्रशांत जितेकर, श्री. राजेश पाटील, श्री. चिंतामणी घोपरकर, श्री. आकाश पाटील, श्री. विकास पाटील, श्री. आर.आर.पाटील, श्री. निलेश पाटील, श्री. रोशन जितेकर व इतर मान्यवर उपस्थित होते.




# अन्वी येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:-योगेश पालोदकर/सिल्लोड:-**महात्मा गांधी विद्यालय,अन्वी येथे दिनांक 3 फेब्रुवारी 2025 रोजी इयत्ता दहावी व बारावी च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक मनोज देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून लॉजिक कॉम्प्युटरचे संचालक जितेंद्र पाडवे उपस्थित होते. विद्यालयाचे शिक्षक अनिल तायडे व गोविंद गोरे यांनी जितेंद्र पाडवे यांची मुलाखत घेऊन दहावी बारावीनंतर शिक्षणाचे विविध क्षेत्राविषयी विद्यार्थ्यांना माहिती करून दिली. विद्यार्थ्यांनीही त्यांच्या करिअर विषयी असलेले प्रश्न या मुलाखती दरम्यान विचारले. याप्रसंगी अमोल पार्वे, आरती दांडगे, चैताली बदर, श्रेयस चापे विद्यार्थ्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अन्वर पिंजारी, सदानंद झाल्टे, नारायण खेडकर, अंकुश सुरडकर, लोकेश पालोदकर, संजय जाधव, आबा गाढवे, श्रीमती रेखा मादनकर यांनी प्रयत्न केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिती उबाळे आणि पूजा भागवत यांनी तर आभार प्रदर्शन मोनिका शिंदे यांनी केले.



# दैनिक युवक आधारचे संपादक संतोष आमले यांना साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार प्रदान



**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी**–थोर क्रांतिकारक साहित्यिक स्वातंत्र्यसेनानी व समाजवादी विचारवंत साने गुरुजी यांची 24 डिसेंबर रोजी शतकोत्तर रोप्यमहोत्सव जयंती साजरी करण्यात आली त्यानिमित्त परेल मुंबई येथे रविवार दिनांक 2 फेब्रुवारी रोजी सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती ( महाराष्ट्र राज्य),च्या वतीने विशेष उल्लेखनिय कार्याचा व सेवेचा गौरव म्हणून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमांमध्ये साने गुरुजी यांच्या भारतीय संस्कृती बाबतचा विचारांची उजळणी करण्यात आली तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यामध्येच युवा नेतृत्व म्हणून दैनिक युवक आधारचे संपादक, कर्तुत्वान, अभ्यासू, जनसंपर्क व्यक्तिमत्व संतोष शिवदास आमले यांना साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार मुंबई विद्यापीठाचे मा.कुलगुरु तथा माजी खासदार डॉ भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते मुंबई येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. आता पर्यंत संतोष आमले यांना दादासाहेब फाळके 2025 अवॉर्ड तसेच ललकारी सन्मानाची राज्यस्तरीय पुरस्कार, पनवेल येथे भीम रत्न पुरस्कार,असे अनेक पुरस्कार त्यांच्या कामाची दखल घेऊन प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे संतोष आमले चे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.आज गुरुजींचे विचार समयोजित आहेत खऱ्या भारतीय संस्कृतीच्या विकासासाठी सक्रिय होणे हीच गुरुजींना त्यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त आदरांजली ठरेल असे संतोष आमले यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हटले

10 पेक्षा जास्त वर्षाचा उद्योगांचा अनुभव असलेल्या दैनिक युवक आधार चे संपादक संतोष आमले यांनी आपल्या वृत्तपत्र व उद्योगाच्या माध्यमातून मार्गदर्शन म्हणून एक उत्तम पिढी घडवण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. नेतृत्व आणि नवकल्पनांचा प्रवास खूप सहनशीलता मागतो आणि संतोष आमले यांनी आपल्या व्यवसाय आणि वृत्तपत्राचे कौशल्याने व्यवस्थापन केले ते सांगतात की त्यांचे कुटुंब हा त्यांच्या जीवनातील अविभाज्य भाग आहे जो नेहमीच त्यांच्या पाठीशी खंबीर उभा असतो.

नैतिकता आणि प्रामाणिकता हे संतोष आमले संपादक दैनिक युवक आधार यांच्या यशाचे आधारस्तंभ आहेत.संतोष आमले यांना आपल्या यशाबद्दल विचारले असता त्यांनी सांगितले चांगल्या परिणामांसाठी प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करा परिणामावर नाही







# पनवेल युवा चे संपादक निलेश सोनावणे याना मुंबई विद्यापीठाचे मा कुलगुरू तथा मा खासदार डॉ भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी**–थोर क्रांतिकारक साहित्यिक स्वातंत्र्यसेनानी व समाजवादी विचारवंत साने गुरुजी यांची 24 डिसेंबर रोजी शतकोत्तर रोप्यमहोत्सव जयंती वर्षानिमित्त सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांचा साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्काराने गौरव करण्यात आला ,यामध्ये ,गेली २५ वर्षे सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पनवेल युवा चे संपादक निलेश सोनावणे याना मुंबई विद्यापीठाचे मा कुलगुरू तथा मा खासदार डॉ भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला .परेल मुंबई येथील एम डी कॉलेज च्या सभागृभात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे मा कुलगुरू तथा मा खासदार डॉ भालचंद्र मुणगेकर सर उपस्तिथ होते . सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती ( महाराष्ट्र राज्य),च्या वतीने विशेष उल्लेखनिय कार्याचा व सेवेचा गौरव म्हणून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमांमध्ये साने गुरुजी यांच्या भारतीय संस्कृती बाबतचा विचारांची उजळणी करण्यात आली तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निलेश सोनावणे हे गेली २३ वर्षे पत्रकार क्षेत्रात असून गेली १६ वर्षे पनवेल युवा हे वर्तमानपत्र चालिवत समाजातील पीडित वंचितांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून आपला हक्क अधिकार मिळवुन देण्याचे काम करीत आहेत . डॉ बाबासाहेब आंबेडकर ,चळवळीत कार्यकर्ते आहेत गेली अनेक वर्षे ते छत्रपती शिवाजी महाराज ,शाहू महाराज ,महात्मा जोतिबा फुले ,सावित्रीबाई फुले ,कर्मवीर भाऊराव पाटील या महापुरुषांचा आदर्श समोर ठेऊन सामाजिक क्षेत्रात कार्य करीत असून दलित आदिवासी ,गरजू लोकांसाठी काम करीत आहेत. जेथे कोण पाहोचून मदत ,सामाजिक काम करीत नाहीत अशा दुर्गम भागात जाऊन दे समजासेवा करीत असतात , पर्यावरणातील समतोल राहावा या करीता दर वर्षी वृक्ष लागवडीचा संकल्प ते करीत आहेत आत्तापर्यंत हजारो झाडे लावून ती जगवली आहेत .पर्यावरणसह ,कला क्रीडा सांस्कृतिक वारसा जंपण्यासाठी ते काम करीत आहेत ,अनेक सामाजिक संघटनेचे ते अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत .लोकशक्ती संजीवनी प्रतिष्टान महाराष्ट्र या संस्थेचे ते राष्टीय उपाध्यक्ष म्हणून काम करीत आहेत विविध धार्मिक संघटनाचे ते प्रतिनिधित्व करीत आहेत ,पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीचे गेली सात वर्ष सलग ते अध्यक्ष म्हणून काम करत आहेत ,त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत भीम महोत्सव समितीने त्यांना या वर्षी भीमरत्न पुरस्काराने सन्मानित केले आहे .या अगोदर पनवेल भूषण ,डॉ बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप पुरस्कार ,वामनदादा कर्डक उत्कृष्ट लेखक पुरस्कार या सह बौद्ध समाजाची शिखर संस्था असलेल्या भारतीय बौद्ध महासभेने त्यांना पत्रकाररत्न पुरस्काराने सन्मानित केले आहे .जिल्हास्तरापासून ते राज्यस्तरापर्यंत पंचवीस ते तीस पुरस्काराने त्यांना आतापर्यंत विविध संस्थांनी त्यांना गौरविले आहे .कोरोना सारख्या जागतिक लाटेत त्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता अनेक रुग्णांची सेवा केल्याने माजी आमदार दत्तू शेत पाटील शिक्षण प्रसारक मंडळाने कोरोना देवदूत पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे . पनवेल युवा चे संपादक निलेश सोनावणे याना मुंबई विद्यापीठाचे मा कुलगुरू तथा मा खासदार डॉ भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आल्याबाबद्दल सामाजिक ,धार्मिक शैक्षणिक ,उद्योग क्षेत्रातील मान्यवरांकडून निलेश सोनावणे याना शुभेच्छा वर्षाव होत आहे .



# पनवेल तालुका अखिल भंडारी सेवा मंडळाचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी-**आजच्या पनवेल तालुका अखिल भंडारी सेवा मंडळाचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. गेली सन 1962 साला पासून मंडळाच्या माध्यमातून समाजाचं काम करत आहे.यावेळी ५०० सभासदांनी सहभाग नोंदविला. प्रमुख पाहुणे म्हणून मुंबईस्थित वास्तुविशारद श्री. संदीप कनगुटकर व श्री. रविंद्र हेदुकर , संमेलनाध्यक्ष श्रीमती सुजाताताई आंबेरकर याच्या हस्ते दिपप्रज्वलन झाले. मंडळाचे अध्यक्ष श्री. डॉ. दिपक खोत यांनी प्रास्ताविक भाषण केले. यावेळी लहान - मोठयांचे सांस्कृतिक कार्यक्रम , जेष्ठ नागरिक सन्मान , गुणवंत विद्यार्थ्याचे कौतुक असे विविध कार्यक्रम झाले. सौ.अलकाताई तोडणकर यांनी होममिनिस्टर कार्यक्रम अर्तगत प्रायोजित केलेली पैठणी सौ. अक्षया पंकज पेवेकर यांनी जिंकली. मंडळाचे सेक्रेटरी श्री . रत्नराज महाडीक यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी खजिनदार सौ. श्रुती केळसकर, उपाध्यक्ष मि. राजेश कनगुटकर श्री व सौ. विनीता विनायक शिवलकर, सांस्कृतिक कमीटी प्रमुख मि. अरविंद बागकर व त्यांचे इतर सहकारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यास मोलाचे सहकार्य लाभले. तसेच सदर कार्यक्रमाला पनवेलचे कर्तुत्वान आमदार प्रशांत ठाकूर उपस्थिती राहुन भंडारी समाजाला मार्गदर्शन केले समाजाला येणाऱ्या अडचणी माझ्याकडून सोडवण्याचे प्रयत्न करेन असे यादरम्यान बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.









# चितेगाव ते बिडकीन गावामधील रस्त्याचे काम पूर्ण करा अन्यथा रास्ता रोको आंदोलन करू - मनोज पेरे

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- ऋषिकेश सुरशे**

**छत्रपती संभाजीनगर**-NH-752E या राष्ट्रीय महामार्गावरील चितेगाव ते बिडकीन या रस्त्याचे काम बऱ्याच दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत, तसेच धुळीचे प्रमाणही खूप वाढले आहे. या रस्त्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे सर्वदूर धुळीचे साम्राज्य पसरले असून या धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. विशेषतः लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींना श्वसनाच्या समस्या व इतर आजार होण्याची शक्यता वाढली आहे. रस्त्याचे काम बंद असल्यामुळे आणि रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. तसेच बिडकीन येथे रोडलगत सरस्वती भुवन शाळा आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहेत, तर चितेगाव येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहे. या शाळांमध्ये लहान विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षण घेतात. रस्त्यावरील धुळीमुळे या विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून, मैदानी खेळ धुळीमुळे बंद आहे. विद्यार्थ्यांना ने-आण करणारे पालक व वयोवृद्ध व्यक्तींनाही त्रास होत आहे.रस्त्यावरील धुळीमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून दुचाकी चालवणे अत्यंत कठीण झाले आहे. डोळ्यात धूळ गेल्यामुळे अनेक अपघात घडत आहेत, ज्यामुळे अनेकांना गंभीर दुखापती झाल्या आहेत. बिडकीन बसस्थानकावर धुळ असल्याने, प्रवाशांना येथे उभे राहणेही कठीण झाले आहे., चितेगाव व बिडकीन गावामधील रस्त्याचे बंद पडलेले काम त्वरित सुरू करून धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्या. तसेच निलजगाव फाटा ते पोलिस कॉलनी या रस्त्यावर महाराष्ट्र भूषण शाळा, हॉस्पिटल, पोलिस स्टेशन, बाजारपेठ व मोठा आठवडी बाजार असल्याने रहदारी खूप वाढली आहे. त्यामुळे पोलिस स्टेशन समोर अनेक अपघात घडले आहेत. रस्त्यावर आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक (Speed Breakers) बसवावेत, जेणेकरून अपघात होणार नाहीत. अशी मागणी मनोज पेरे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पैठण तालुका प्रमुख यांनी प्रशासनांना मागणी केली आहे. याची लवकरात लवकर दखल घ्यावी अन्यथा, येत्या ०५ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता निलजगाव फाटा येथे तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल. अशा इशारा देण्यात आला.

==================



द•ख•ल

## बनावट नोटांप्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**: शंभर रुपयांच्या पाच बनावट नोटा वितरित करून फसवणूक केल्याप्रकरणी नामदेव महादेव नगराळे (राहणार शांतीवन सोसायटी, सेक्टर 15 नवीन पनवेल) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.जीवराज भाटी हे नवीन पनवेल येथे किराणा मालाचे दुकान चालवतात. त्यांच्या दुकानात एक इसम आला. त्याने शंभर रुपयाच्या तीन नोटा दिल्या त्यावेळी 265 रुपयाचा माल खरेदी केल्यानंतर 35 रुपये परत दिले. यावेळी शंभर रुपयांच्या नोटा बनावट असल्याचा संशय आला. त्यानंतर 28 जानेवारी रोजी पुन्हा तो इसम दुकानात आला आणि त्याने तीन किलो पीठ खरेदी केले. यावेळी शंभर रुपयांच्या दोन नोटा दिल्या त्या नोटा देखील बनावट दिसून आल्या. यावेळी पोलिसांना बोलावण्यात आले. त्यानंतर नामदेव नगराळे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

================================

## पत्नीला मारहाण केल्या प्रकरणी पति विरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**–पत्नीला मारहाण केल्याप्रकरणी पतीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.सना डिंगणकर या घरकुल, उसरली खुर्द येथे पतीसह राहत आहेत. 29 जानेवारी रोजी त्या त्यांच्या मुलांना घेऊन फिरण्यासाठी बाहेर गेले होत्या. त्यानंतर रात्री घरी आल्या. यावेळी पतीने मुलीला जेवण करण्यावरून मोठ्या आवाजात बोलले. याचा जाब विचारण्यासाठी त्या गेले असता पत्तीने तुला रात्री जेवण नाही बनवायचं, मुलांना फिरवायला टाईम आहे तुझे पैसे मला दे असे बोलून पत्नीच्या अंगावर धाऊन आले आणि पोटावर लाथ मारली. त्यानंतर लाटण्याने डोक्यात मारहाण केली. यात त्या जखमी झाल्या. 31 जानेवारी रोजी पती तनवीर डिंगणकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

========================

## मोबाईल आणि रोख रकमेची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**–पत्र्याच्या रूम मध्ये झोपलेला असताना शटर मधून प्रवेश करून अनोळखी इसमाने मोबाईल आणि रोख रक्कम असा 45 हजार रूपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.उस्मान खान हा कोपरा गाव, सेक्टर 10 खारघर येथे राहत असून त्याच्या चिकन सेंटरच्या बाजूला असलेल्या पत्र्याच्या रूम मध्ये तो राहतो. 28 जानेवारी रोजी काम संपवून तो पंचवीस हजार रुपये खिशात ठेवून झोपी गेला. सकाळी उठला असता शटर उघडे दिसले आणि खिशातील पैसे मिळुन आले नाहीत आणि त्याचा मित्र असिफचा मोबाईल मिळून आला नाही. तसेच त्याने कपाटात ठेवलेले दहा हजार रुपये देखील सापडले नाहीत.

==========================

## इसम बेपत्ता

**दैनिक युवक आधार**



**पनवेल, (वार्ताहर)** :राहत्या घरातून एक इसम कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.के.आर. सुरेश (66 रा.केंद्रीय विहार, खारघर) रंग सावळा, उंची 5 फुट 7 इंच, बांधा सडपातळ असून अंगात हिरवा टी-शर्ट व ब्राऊन रंगाची पँन्ट, पायात सॅण्डल आहे व त्याला इंग्लिश, हिंदी, मल्याळम, तमीळ ही भाषा अवगत आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाणे किंवा पो.हवा.एस.एस.गोसावी यांच्याशी संपर्क साधावा.

## सुरकुंडी गावचे सामाजिक कार्यकर्ते कै. बबन तुकाराम वाजे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ/खेड पुणे**–दिनांक 2 /2/2025 रोजी रात्री नऊ वाजता छातीत अचानक तीव्र वेदना झाल्यामुळे ते जमिनीवर कोसळले व त्यातच त्यांच्या आकस्मित निधन झाले. कै. बबनराव तुकाराम जाधव यांनी मुंबई येथे पोलीस खात्यामध्ये काही वर्ष नोकरी करून ते पीएसआय पदावरती सेवानिवृत्त झाले व गावच्या जडणघटनेमध्ये त्यांनी हिरारीने भाग घेऊन आपला ठसा उमटण्याचा प्रयत्न केला एक वर्षापूर्वी त्यांच्या पत्नी सौ कमल बबन वाजे यांचे देखील निधन झाले गावाला राहून त्यांनी अनेकांच्या सुखदुःखात जाऊन त्यांनी आपली सामाजिक भूमिका बजावली त्यांच्या जाण्याने सुरकुंडी गावामध्ये दुःखाचा डोंगर कोसळला आहे . त्यांना एक मुलगा व तीन मुली आहेत.



# पनवेल विधानसभा क्षेत्रात नमो चषक २०२५ भव्य क्रीडा महोत्सव

## खारघरमध्ये भव्य क्रिकेट, कळंबोलीत कुस्ती तर कामोठेत व्हॉलीबॉल, रस्सीखेच आणि फुटबॉल स्पर्धा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)**–उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलतर्फे पनवेल विधानसभा मतदार संघात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली दिनांक ०६ ते ०९ फेब्रुवारी पर्यंत भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. नमो चषक अंतर्गत दिनांक ६ ते ९ फेब्रुवारी पर्यंत खारघर मधील सेक्टर १४ येथील जय हनुमान चेरोबा बापदेव मैदानावर भव्य क्रिकेट स्पर्धा, कामोठेमधील सेक्टर ६ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या मैदानावर दिनांक ०७ फेब्रुवारीला व्हॉलीबॉल स्पर्धा, ०८ फेब्रुवारी रोजी रस्सीखेच तर ०९ फेब्रुवारीला फुटबॉल स्पर्धा होणार आहे. तर ०९ फेब्रुवारी रोजी कळंबोली मधील सेक्टर १६ येथे भव्य कुस्ती स्पर्धा होणार आहे. खारघर येथे भव्य टेनिस क्रिकेट सामने दिवस रात्र अशा स्वरूपात होणार असून या स्पर्धेतील विजेत्या संघास १ लाख ११ हजार १११ रुपये, उपविजेत्यास ५५ हजार ५५५ रुपये तर तृतीय क्रमांकाच्या संघास ३३ हजार ३३३ रुपये तसेच मॅन ऑफ दि सिरीजला दुचाकी मोटारसायकल आणि दररोज लकी ड्रॉ अशी भरघोस पारितोषिके क्रिकेट स्पर्धेसाठी आहेत. कामोठे येथे होणाऱ्या व्हॉलीबॉल स्पर्धेतील विजेत्या संघाला १५ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला १० हजार रुपये व चषक तर तृतीय क्रमांकास ५ हजार रुपये व चषक, फुटबॉल स्पर्धेतील विजेत्या संघास २० हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १० हजार रुपये तर तृतीय क्रमांकाला ५ हजार रुपये आणि सर्व विजेत्या संघास प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. रस्सीखेच स्पर्धा पुरुष व महिला अशा गटात होणार आहे. यामध्ये पुरुष गटातील प्रथम क्रमांकाला ७ हजार रुपये व चषक, द्वितीय पारितोषिक ५ हजार रुपये व चषक, तृतीय पारितोषिक ३ हजार रुपये व चषक, महिला गटातील प्रथम पारितोषिक ७ हजार रुपये व चषक, द्वितीय पारितोषिक ५ हजार रुपये व चषक तर तृतीय पारितोषिक ३ हजार रुपये व चषक तसेच प्रत्येक फेरीतील विजेत्या संघाला रोख १ हजार रुपये असे बक्षिसांचे स्वरूप आहे. कळंबोली येथे ०९ फेब्रुवारीला होणाऱ्या भव्य कुस्ती स्पर्धेत रुस्तम ए हिंद पै. सिकंदर शेख (सोलापूर) विरुद्ध रुस्तम ए हिंद लाली गुरुदास पोल (पंजाब) यांचा खास आकर्षण सामना होणार असून यामधील विजेत्या पैलवानास पाच लाख रुपये व मानाची गदा, तर महिलांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पै. अमेधा घरत (पनवेल) विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पै. अंकिता फातले (कोल्हापूर) यांचा खास आकर्षण सामना होणार असून विजेत्या पैलवानाला ५१ हजार रुपये व मानाची गदा देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरुषांच्या गटात महाराष्ट्र चॅम्पियन पै. निखिल कदम विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पै. अनिल कचरे, पै. शुभम वळखडे विरुद्ध पै. आकाश दुबे, पै. श्रेयश कचरे विरुद्ध पै. सुशांत देवमाने, पै. साजन पावशे विरुद्ध पै. निलेश कदम, आणि पै. समाधान घनपट विरुद्ध विजय घुले यांच्या सामना रंगणार आहे. महिला गटात पै. स्नेहा येवले विरुद्ध वैष्णवी यादव आणि पै. रितिका कारंडे विरुद्ध गौरी जाधव यांचा विशेष सामना होणार आहे. कुस्ती स्पर्धेतील महिला ३५, ४० व ४५ किलो वजनाखालील गटातील प्रत्येकी विजेतीला १ हजार रुपये तर उपविजेतीस ५०० रुपये, ५० किलो खालील गटातील विजेतीला १५०० रुपये व तर उपविजेतीस १ हजार रुपये, ५५ किलो वजनाखालील गटातील विजेतीला २ हजार रुपये तर उपविजेतीस १५०० रुपये आणि ५७ ते ७६ किलो वजनाखालील गटातील विजेतीस १० हजार रुपये व नमो केसरी मानाची गदा तर द्वितीय क्रमांकाला ५ हजार रुपये तर तृतीय क्रमांकाला ३ हजार रुपये, १७ वर्षाखालील मुले गटातील ३०, ३५, ४० व ४५ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकास प्रत्येकी १ हजार रुपये तर द्वितीय क्रमांकाला ५०० रुपये, ५० व ५५ किलो खालील गटातील प्रथम क्रमांकाला प्रत्येकी १५०० रुपये द्वितीय क्रमांकास प्रत्येकी १ हजार रुपये, ६०, ६५ आणि ७० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकास अनुक्रमे २ हजार रुपये, ३ हजार रुपये आणि ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास अनुक्रमे १५००, २ हजार आणि ३ हजार रुपये, वरिष्ठ मुले ५० ते ६० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला ३ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास २ हजार रुपये, ६० ते ७० किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ३ हजार रुपये, ७० ते ७९ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ३ हजार रुपये, तसेच ७९ ते १२५ किलो वजनाखालील गटातील प्रथम क्रमांकाला १० हजार रुपये व नमो केसरी मानाची गदा, द्वितीय क्रमांकास ५ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकाला ३ हजार रुपये असे कुस्ती स्पर्धेत एकूण ८ लाख ५१ हजार रुपयांच्या बक्षिसांचे स्वरुप आहे. मागील महिन्यात उलवा नोडमध्ये नमो चषक मोठ्या भव्य स्वरूपात आणि दिमाखदारपणे पार पडले. सात हजाराहून अधिक स्पर्धकांनी आणि हजारो क्रीडारसिकांनी या स्पर्धेचा लाभ घेतला होता. त्याच अनुषंगाने या स्पर्धाही भव्य दिव्य आणि उत्कृष्ट नियोजनात होणार आहेत. त्यानुसार या स्पर्धेची जय्यत तयारी सुरु आहे.




## मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या संदर्भात राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी घाटकोपर पश्चिमच्या वतीने आढावा बैठकीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर(केतन भोज)**–मुंबई महानगरपालिकेच्या येणाऱ्या निवडणुकीसंदर्भात आढावा घेण्यासाठी व पूर्व तयारीसाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी(अजित पवार गट)घाटकोपर पश्चिम तालुक्यातील बेसिक, महिला,विद्यार्थी,सेवादल,असंघटित कामगार विभाग व सर्व फ्रंटलच्या पदाधिकाऱ्यांची व कार्यकर्त्यांची सभा बुधवार दि.०५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५:३० वाजता मार्केट इमारत,विर माता जिजाऊ मनोरंजन गार्डन समोर,एन.एस.एस रोड घाटकोपर पश्चिम मुंबई याठिकाणी आयोजित करण्यात आली आहे.तरी या सदर सभेस शिवाजीराव नलावडे (कार्याध्यक्ष मुंबई विभागीय राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी) व सुरेश भालेराव(घाटकोपर जिल्हाध्यक्ष),श्रीमती शालिनीताई गायकवाड(निरिक्षक-घाटकोपर(पश्चिम) तालुका इत्यादी मान्यवरांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभणार असून या आढावा बैठकीला सर्व राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या सर्व महिला,पुरुष कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन घाटकोपर पश्चिम तालुका अध्यक्ष हिराचंद्र चंद्रकांत सुर्यवंशी यांनी केले आहे.



## मराठा आरक्षण मिळाले नाही, कंटाळून ३८ वर्षीय युवकाची आत्महत्या

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधीः-योगेश पालोदकर/सिल्लोडः**-मराठा समाजाला आरक्षण मिळाले नाही, सरकार मराठा समाजाची फसवणूक करत आहे. या सर्व गोष्टींना कंटाळून मी आत्महत्या करीत आहे.... अशी चिट्ठी लिहून ३८ वर्षीय युवकाने स्वतःच्या शेतातील शेततळ्यात उडी घेऊन आत्महत्या केली. खुपटा (ता.सिल्लोड) इथे रविवारी (२ फेब्रुवारी) दुपारी बाराला हा प्रकार समोर आला.समाधान रायभान काळे (वय३८,रा.खुपटा) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. काळे घरातून कोणाला काहीही न सांगता शनिवारी मध्यरात्रीनंतर १ ला घरातून निघून गेले होते. रविवारी त्यांचा मृतदेह त्यांच्याच शेतातील शेततळ्यात मिळाला. छत्रपती संभाजी नगर येथून आलेल्या अग्निशामक दलाच्या जवानांनी मृतदेह शेततळ्यातून बाहेर काढला. अजिंठा ग्रामीण रुग्णालयात मृतदेह नेला असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. अजिंठा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल ढाकणे, पोलीस उपनिरीक्षक गणेश काळे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी येऊन पंचनामा केला. काळे यांच्या खिशात हस्तलिखित सुसाईट नोट आढळली. ती भिजल्याने बराचसा मजकूर गहाळ झाला आहे, मात्र त्यात लिहिले आहे की, मी रायभान काळे (खुपटा) नापिकी आणि शेकडो मोर्चे आंदोलने झाली. तरीसुद्धा मराठा समाजाला आरक्षण मिळाले नाही. सरकार मराठा समाजाची फसवणूक करत आहे. याला कंटाळून मी आत्महत्या करत आहे. या आत्महत्येने तरी सरकारचे डोळे उघडावे. गरजवंत मराठा समाजाला आता तरी शासनाने आरक्षण द्यावे. असे चिठ्ठीत नमूद आहे.



## वाई येथे अखंड हरिनाम सप्ताह संगीत रामायण कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा तसेच श्री रामदूत बजरंग बली प्राणप्रतिष्ठा व कळशारोहन सोहळा




**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी-नामदेव.मंडपे जालना**–मंठा तालुक्यातील वाई येथे अखंड हरिनाम सप्ताह दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मित्ती मा 6 सहा दिनांक 3/2/2025 वार सोमवार हरिभक्त परायण गुरुवर्य भगवान बाबा आनंदगडकर यांच्या आशीर्वादाने दैनंदिन कार्यक्रम पहाटे 4 ते 6 काकडा, भजन 6,7विष्णुसहस्त्रनाम-7 ते 9 ज्ञानेश्वरी पारायण 9 ते 11 गाथा भजन-1 ते 4 राम कथा-सायंकाळी 5 ते 6 हरिपाठ व रात्री 8 ते 10 हरिकीर्तन व नंतर हरी जागर होईल.

**शिवचरित्रकार श्री हरिभक्त परायण** -1) बाळासाहेब महाराज शिंदे फेमस आळंदी देवाची यांचं सोमवार दिनांक 3/2/ 2025 रोजी पहिले कीर्तन होणार आहे तरी परीसरातील भाविक भक्ताने या कीर्तनाचा आनंद घ्यावा अशी वाईगावातील सर्व नागरिकांची इच्छा आहे.2) हरिभक्त डॉक्टर अरुण वाळके संतपिट श्री क्षेत्र पैठण यांचे कीर्तन होणार आहेत.3) हरिभक्त श्री प्राध्यापक उद्धव महाराज राऊतआकनिकर एम ए संगीत यांचे कीर्तन होणार आहेत.4) हरिभक्त म माळोदे आष्टी. 5) हरिभक्त नारायण म पिंपळे गुरुजी. 6) हरिभक्त नंदू जाधव खडका. 7) हरिभक्त सागर म.दिंडे नाशिक 8) हरिभक्त अर्जुन म मोठे महाराज पळशीकर यांचे अमृततुल्य वाणीतून दहा ते बारा वाजताकाल्याचे कीर्तन होईल व नंतर महाप्रसाद होईल.तसेच सर्व पंचकुशीतील भाविक भक्तांनी वरील कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा अशी वाई येथील गावकऱ्यांच्या वतीने इच्छा आहे तसेच बजरंग बली हनुमान यांच्या कलाशारोपण कार्यक्रमाची मोठी भव्य दिव्य अशी मिरवणूक काढून श्री बजरंग बली हनुमान यांची प्राणप्रतिष्ठा आपल्या सर्वांच्या वतीने व आपल्या सर्वांच्या शाक्षेने स्थलांतरित करण्यात येणार आहे तरी परिसर सरातील सर्व भाविक भक्तांनी आपण प्रत्यक्ष हजर राहून याचा आनंद घ्यावा व आशीर्वाद घ्यावा.

## श्रीसंत मिराबाई आईसाहेब यांच्या २७व्या पुण्यतिथी निमित्त

### ह.भ.प.नंदिनीताई महाराज यांचे किर्तन

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** -श्रीसंत मिराबाई आईसाहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्रातील ख्यातनाम किर्तनकार नंदिनीताई महाराज यांचे आज दिनांक ४ फेब्रुवारी मंगळवार रोजी श्री.क्षेत्र मिराबाई आईसाहेब संस्थान महासांगवी या ठिकाणी अमृततुल्य असे किर्तन होणार आहे. तरी पाटोदा आणि पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या किर्तनाचा अवश्य लाभ घ्यावा. असे आवाहन या सप्ताहाचे आयोजक श्री.क्षेत्र मिराबाई आईसाहेब संस्थानच्या मठाधिपती महंत ह.भ.प.राधाताई महाराज (आईसाहेब) यांनी केले आहे. तरी पाटोदा आणि पाटोदा पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या सर्व किर्तनाचा व शिव महापुराण कथेचा लाभ घ्यावा. असे आवाहन समस्त ग्रामस्थ महासांगवी, कवडवाडी यांनी केले आहे.




## पी.जे.बी.नॅशनल पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न




**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)**-प्रतीक जयंत भोईर मेमोरियल फाउंडेशनच्या पी.जे.बी. नॅशनल पब्लिक स्कूल पळस्पे येथे 3 री ते 8 वीच्या वर्गांचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे झाले.या कार्यक्रमाला पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे व मुंबई हायकोर्टच्या वकील रिंपल त्रिवेदी ह ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्याप्रसंगी स्कूलचे चेअरमन डॉ.जयंत भोईर ,सौ. प्रार्थना भोईर, श्री मदन कोळी (माजी नगराध्यक्ष), सौ प्रमिला त्रिवेदी,सौ व श्री कमलेश अग्रवाल,सौ व श्री संजय पाटील , सौ व श्री दीपक पाटील,सौ.व श्री सिद्धेश पाटील,शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. राजेश्री जगदाळे,शिक्षक वर्ग,विद्यार्थी व पालक उपस्थित होते. छत्रपती संभाजी महाराज, महाभारत अशा विविध गाण्यांवर विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार सादर केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका कु. सानिका पाटील व कु.अंजली कदम यांनी केले.

## सनशाइन प्री प्रायमरी स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**रसायनी आनंद पवार**-खालापूर तालुक्यातील चांभाली येथील सनशाइन प्री प्रायमरी स्कूलचा स्नेहसंमेलन मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला. यावेळी चिमुकल्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वाह वाह मिळवली तर प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या स्नेहसंमेलनाला जिल्हा परिषदेच्या माजी महिला बालकल्याण सभापती तथा वासांबे ग्रुप ग्रामपंचायतीच्या विद्यमान लोकनियुक्त सरपंच सौ. उमा संदीप मुंढे व माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य संदीप शेठ मुंढे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सनशाइन प्री प्रायमरी स्कूलचे नर्सरी ते सिनियर केजी च्या चिमुकल्यांनी यावेळी आपली कला गुण सादर करुन वाह वाह मिळवली. तर प्राविण्य प्राप्त चिमुकल्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सनशाइन प्रायमरी स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. योगिनी गायकवाड यांनी उपस्थित मान्यवरांचे व पालकांचे स्वागत केले.



दैनिक युवक आधार (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नांदेड दौरा

## महाराष्ट्रातील महानुभाव पंथाच्या सर्व प्रमुख श्रद्धास्थळांचा विकास करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी/चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर/ नांदेड -:** हदगाव येथील पुरातन श्रीकृष्णदेव उखळाईमंदिर नवपर्व व कलशारोहण सोहळाहदगाव दि. 2 फेब्रुवारी पुढील पाच वर्षामध्ये महानुभाव पंथाच्या सर्व प्रमुख श्रध्दास्थळांचा विकास करण्याचा संकल्प राज्य शासनाने केला आहे. काही ठिकाणी विकास कामांना सुरुवात झाली आहे, उर्वरित ठिकाणी लवकरच कामे सुरु होतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.नांदेड जिल्ह्यातील महानुभाव पंथीयांचे श्रद्धास्थान असणाऱ्या हदगाव येथील श्री. गुरुवर्य बापूनगर परिसरातील श्रीकृष्ण देव उखळाई मंदिराच्या नवपर्व व कलशारोहण सोहळ्यात उद्घाटक म्हणून ते उपस्थित होते. मराठवाडा,विदर्भ व महाराष्ट्रातील ठीक ठिकाणच्या महानुभाव पंथाच्या मठाधिपतींसह हजारोच्या संख्येने महानुभवपंथीय या सोहळ्याला उपस्थित होते.वैराग्यमूर्ती मठाधिपती महंत श्री. योगी बापू यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तर माहूर पिठाधीश कवीश्वराचार्य माहुरकर बाबा यांच्यासह परिसरातील मठाधिपती धर्मपीठावर विराजमान होते. महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या या मठाधिपतींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना महानुभाव पंथीयांसाठी केलेल्या कार्यकर्तृत्वाला लक्षात घेऊन स्तुती सुमनांनी साकारलेले सन्मानपत्र बहाल केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वप्रथम चक्रधर स्वामीना दंडवत घातला. त्यानंतर धर्मपीठावरून बोलताना सर्वज्ञ चक्रधर स्वामी व त्यांच्या अनुयायांनी अतिशय विपरित परिस्थितीत धर्म रक्षणाचे कार्य केल्याचे स्मरण केले. महानुभव पंथीयांच्या कार्यकर्तृत्वाचा त्यांनी गौरव केला.परकीय आक्रमणामुळे कृष्णदेवाची पुजा करून घेणे, हिंदू म्हणवून घेणे कठीण होते. त्या काळात चक्रधर स्वामीनी जातीपाती, पंथाचा विचार न करता महानुभव दाखवला, समरसता व समता युक्त समाज त्याकाळी देशात निर्माण केला.महाराष्ट्र शासनाने राज्यभरात आतापर्यंत ज्या ज्या ठिकाणी महानुभाव पंथीयांचे मंदिर आहेत. त्या मंदिरांचा विकास करण्याचे काम केल्याचे सांगितले. रिद्धपुरचा पांचाळेश्वर, जाळीचा देव, गोविंद प्रभू देवस्थान या अनेक ठिकाणी संवर्धनाचे काम सुरु आहे. याही पुढे हे कार्य सुरू राहील, असे आश्वस्थ केले. तसेच या स्थळांच्या ठिकाणी असलेली अतिक्रमणे हटविण्यासाठी चर्चेतून मार्ग काढून येथील विकास कामे केली जातील. चांगल्या कामांसाठी राज्य सरकार ताकदीने पाठिशी उभे राहील, असे सांगितले.यावेळी त्यांनी महानुभावपंथीयांच्या ग्रंथ प्रेमाची, धर्म साहित्य निर्मितीच्या चिकाटीचे कौतुक केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, राजमान्यता मिळाली. यामध्ये महानुभाव साहित्याचा मोठा वाटा आहे. आपण जे पुरावे दिले आणि जे स्वीकारले गेले.यातील एक महत्वाचा पुरावा लीळाचरित्र होते.मराठी भाषा किती प्राचीन याचा पुरावा यानिमित्ताने देता आला.







लीळाचरित्र ग्रंथ ज्या ठिकाणी लिहिला गेला, त्या रिद्धपूरला मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. या विद्यापीठाचा विकास पुढील टप्प्यात करण्यात येणार आहे. महानुभाव पंथाच्या माध्यमातून मराठी भाषा विद्यापीठाचा उपयोग करून आपले साहित्य ,विचार,अध्यात्म जगभरामध्ये पोहोचवण्याचे काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. देशाच्या कानाकोप-यात नाही तर अफगाणिस्तानपर्यंत महानुभव पंथ पोहोचला आहे .आज इतका मोठा संप्रदाय आपल्याला समतेच्या अधिष्ठानावर काम करतांना दिसतो. आज या धर्मपीठावर या स्थानावर इतकी मोठी महंत मंडळी येऊन गेली. ही परंपरा पुढे चालू ठेवली पाहिजे, असे त्यांनी धर्मपीठावरील सर्व मान्यवरांना अभिवादन करताना स्पष्ट केले.तत्पूर्वी, त्यांनी आगमन झाल्यानंतर जीर्णोद्धार करण्यात आलेल्या उखळाई माय मंदिरात जाऊन मायचे विडाअवसर दर्शन घेतले केले. आजच या ठिकाणी संत महात्म्यांच्या उपस्थितीत कलशारोहण झाले. हे मंदिर पाचशे वर्षापूर्वीचे असल्याची मान्यता आहे. यावेळी त्यांनी श्रीकृष्ण मूर्तीचे भक्तार्पण केले.कार्यक्रमाचे आयोजक वैराग्यमूर्ती दत्ता बापू यांचा त्यांनी सत्कार केला. भक्तांना प्रातिनिधिक सेवा पुरस्कार बहाल केला. या कार्यक्रमाला बाळासाहेब ठाकरे हरीद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष आ.हेमंत पाटील, हिंगोलीचे खा. नागेश पाटील आष्टीकर,आ. भीमराव केराम, आ. आनंद पाटील बोंढारकर, आ.बाबुराव कदम कोहळीकर,आ. बालाजी कल्याणकर,नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, तहसीलदार सुरेखा नांदे, आदीसह महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या महानुभव पंथाचे पिठाधीशांसह मान्यवर उपस्थित होते.प्रास्ताविक योगीबापु विद्वांस यांनी केले तर आभार संदिपराज दादा कपाटे यांनी मानले. यावेळी अविनाश ठाकरे व कारंजेकर बाबा यांनी मनोगत व्यक्त केले.महाराष्ट्रातील उपस्थित पीठाधीश अ.भा.म.प.अध्यक्ष प.म.श्री विद्वांसबाबा, माहूर पिठाधीश आचार्य श्री माहूरकरबाबा, उपाध्य कुळाचार्य वर्धनस्थबाबा, प.म.श्री. रिधपुरकर बाबाजी, पारिमांडाल्य कुळाचार्य लासुरकर बाबाजी, कविश्वर कुळाचार्य करंजेकर बाबाजी, प.म.श्री मठाधीपती महंत योगीबापु, श्रीगुरु दत्ताबापु, गोपीराजबाबा, कान्हेराज बाबा विद्वांस,पुणंताबेकर महानुभाव, परसराज बाबा विद्वांस, संदीपराज शास्त्री कपाटे, अर्जुनराज दादा नांदेडकर, रमेशराज शास्त्री कपाटे, महंतबाबा वाघोदेकर, बाळकृष्णदादा सरळ, भाईदेवमुनी नांदेडकर, मधुकरदादा धाराशिवकर,विजयराजदादा कारंजेकर आदीसह अन्य मठाधीशांची उपस्थिती होती

# उरणच्या आराध्याने गाठली बक्षिसांची शंभरी !

## बुद्धिबळ स्पर्धांमध्ये वयाच्या 9 व्या वर्षी रचला इतिहास

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**-आराध्या विनोद पुरो हीने विविध बुद्धिबळ स्पर्धांमध्ये मुंबई, मुंबई उपनगरांसह विविध जिल्ह्यांमध्ये ठाणे, रायगड जिल्ह्यांमध्ये गेल्या दोन वर्षांत झालेल्या विविध जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धांमध्ये वयाच्या 9 व्या वर्षी इतिहास रचून आपल्या बक्षिसांची शंभरी गाठली आहे. आराध्या इयत्ता 3 री ईयत्तेमध्ये शिकत आहे. तीला शालेय अभ्यासा व्यतिरीक्त बुद्धीबळ हा खेळ लहान पणापासूनच आवडत असून अतीशय एकाग्रतेनेती खेळत आहे. बघता बघता आराध्या हीने गेल्या दोन वर्षांत 100 स्पर्धांमध्ये सहभागघेतला होता आणि प्रत्येक स्पर्धेत ती यशस्वीही झाली. रविवार दि.2 फेब्रुवारी 2025 ती ठाणे जिल्हा स्तरीय स्पर्धा कोरम मॉल झाली त्यातीने सहभाग घेतलाहितीची 100वी स्पर्धा होती नेहमीप्रमाणे तीने शंभराव्या स्पर्धेत देखील प्रथम क्रमांक पटकावला आहे .या निमित्ताने तीने तीच्य बक्षिसांची शंभरी दोन वर्षांत पूर्ण केली तीच्या या ऐतिहासिक यशाबद्दल तीचे संपूर्ण उरण तालुक्यातून नव्हे तर नवीमुंबई, रायगड जिल्ह्यातील जनतेकडून कौतुक केले जात आहे. आज आराध्याच्या शंभरावी ट्रॉफी छत्रपती शिवरायांच्या चरणावर ठेवण्याची ईच्छा असल्यामुळे विमला तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिहास्नारूढपुतळ्याच्या ठिकाणी आराध्याचा सत्कार करण्यासाठी



उत्स्फूर्तपणे चेस रेफ्री संदीप पाटील, उरण सामाजिक संस्थेचे सरचिटणीस संतोष पवार, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, नगरसेवक अतूल ठाकूर, पत्रकार संघाचे अध्यक्ष घनःश्याम कडू,उपाध्यक्ष विरेश मोडखरकर, उद्योग पती सुरेश ठाकूर, प्रा. निरंतर सावंत , सामाजिक कार्यकर्त्या लता पानसरे, नगरसेवक समिर मुकरी उपस्थित होते.या प्रसंगी कामगार नेते संतोष पवार आणि चेस रेफ्री संदीप पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना आराध्याला भावी काळात तीची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी शुभेच्छा देत असताना आता सर्वांच्या अपेक्षा आराध्याकडून वाढल्या आहेत. तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे लहान पणीच तीची आई रश्मी आणि वडील विनोद पुरो यांनी आपल्या मुलीची आवड लक्षात घेऊन तीला पुर्णपणे सहकार्य करणाचा तसेच तीला मार्गदर्शन करणार्या प्रशिक्षक चेस रेफ्री संदीप पाटील यांची देखील तेवढीच मेहनत आहे या बद्दल सर्वांचे मनापासून अभिनंदन करुन सर्वांनी आराध्याला शाल परीधान करून पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले!या प्रसंगी संजय पवार, अमित नार्वेकर, हितेश पटेल ,मृण्मयी पुरो, रूपाली पवार हर्षवर्धन पवार , चेतन , रवी सोलंकी , हेमंत अधिकारी , महेश वर्तक, विलास शिंदे हे उपस्थित होते.

# कळंबोलीत हळदीकुंकू उत्साहात साजरा






**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर-**सरस्वती महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, कळंबोली आणि सरस्वती महिला नागरी सह.पतपेढी मर्या.कळंबोली यांच्यातर्फे 2 फेब्रुवारी रोजी कळंबोली येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शाळेमध्ये हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष कुंदाताई गोळे, सचिव सुषमा कामतेकर यांच्यासह प्रमुख पाहुणे रेखाताई रामदास शेवाळे, सायली तुकाराम सरक, मोनिका प्रकाश महानवर (माजी नगरसेविका भाजप), ज्योती पाटील (कळंबोली शहर प्रमुख, शिवसेना) चंचला बनकर (शहरप्रमुख खारघर), डी. एन मिश्रा, एड. वैशाली पंडित, स्नेहल बागल यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.महिला जे करू शकते ते कोणीही करू शकत नाही हा इतिहास आहे. त्यामुळे महिलांचा सन्मान करणे गरजेचे असल्याचे शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे यांनी सांगितले. यावेळी उपस्थितांची देखील भाषणे झाली. या ठिकाणी हळदीकुंकू सोहळ्यात महिलांची एकजूट दिसून आली. महिलांना सोबत घेऊन महिलांच्या उदात्तीकरणासाठी चळवळ उभारणाऱ्या कुंदाताई गोळे यांच्या प्रयत्नांमुळे सर्व थरातील महिलांनी एका व्यासपीठावर हजेरी लावली. यावेळी महिला आर्थिक काटकसर ते आर्थिक उत्पन्न वाढ या विषयावर महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. या हळदी कुंकू समारंभात ज्योत्स्ना गोळे, रूपाली शिवथरे, सुनीता गुरव, अनिता कुलकर्णी, वैशाली सुर्वे, वैशाली महाजन, ज्योती पटेल, सीमा पाटील, पुष्पा शिवजातक, शकुंतला गोगावले, वनिता रिठे, पूजा खानावकर, सुजाता कुरूप यांच्यासह शेकडो महिला उपस्थित होत्या.

=======================

# जिजाऊ रमाई सावित्रीबाई फुले अहिल्यादेवी होळकर यांचा आदर्श महिलांनी मनामध्ये ठेवून कार्य करावे संपत गारगोटे

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी डॉ. वेदांत ओव्हाळ/वाडा सरकुंडी-** जिजाऊ रमाई सावित्री आणि लोकमाता आहिल्याबाई होळकर यांचा आदर्श मनामध्ये ठेवून महिलांनी कार्य करावे - संपत गारगोटे : चाकण येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या आठवले गटाच्या कामगार आघाडीच्या वतीने महिलांसाठी हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळेस प्रसिद्ध व्याख्याते संपत गारगोटे यांचे व्याख्यान आयोजित केले होते त्या वेळेस ते बोलत होते स्त्रियांना मान, सन्मान देण्याचं काम जिजाऊ ने केले, तेच काम शिवरायांनी केले. तेच काम अहिल्यादेवींनी केले,सावित्रीने केले. तसेच सर्व स्त्रियांना मुक्ती देण्याचे काम संविधानाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले तरीसुद्धा आज समाजामध्ये अनेक महिलांवरती अन्याय आत्याचार होत आहेत अनेक क्षेत्रांमध्ये महिलांना दुय्यम वागणूक मिळत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशातील महिलांच्या प्रगतीवरून मोजावी म्हणूनच आज सगळ्यांनी महिलांना समानतेची वागणूक देणे गरजेचे असून त्यांना अनेक क्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न शासनाने करायला हवा असं मत संपत गारगोटे यांनी व्यक्त केले. आज स्त्रियांनी संगीत, नाट्य,ग्रिर्यारोहन संगणक अशा सर्व क्षेत्रांमध्ये मुसंडी मारली आहे. आज दहावी बारावी परीक्षेचा निकाल पाहिला तर त्या परीक्षेमध्ये पहिली, दुसरी तिसरी येणारी मुलगीच आहे पण यातील अनेक पहिल्या-दुसऱ्या येणाऱ्या मुली उच्च शिक्षणापर्यंत पोहोचत नाहीत यावरही चिंतन झाले पाहिजे. खेड्यात दहावी-बारावी झाली की त्यांचे आई वडील त्यांचे लग्न लावून देतात आणि ते आपल्या मुलींना उच्च शिक्षणापासून रोखून ठेवत आहेत. यावर सुद्धा आजच्या दिवशी गंभीर चिंतन होणे गरजेचे आहे. समाजाची प्रगती करायची असेल तर महिलांना योग्य ते स्थान उपलब्ध करून देऊन त्यांना प्रगतीचे द्वारे खुले करण्यासाठी शासनाने वेगवेगळी मदत आणखी करणे गरजेचे आहे की जेणेकरून कुटुंबाची, समाजाची आणि देशाची प्रगती होईल असे संपत गारगोटे यांनी. यावेळी विचार मांडले .पोलीस निरीक्षक वाघ साहेब यांनी सुद्धा महिलांना व्हाट्सअप , इन्सटा तसेच सोशल मीडिया द्वारे वेगवेगळ्या माध्यमातून जे प्रलोभने तसेच पैसे दुप्पट वाढण्याचेआमिष आणि वेगवेगळे फसवण्यासाठी वेगवेगळ्या प्लॅन पासून महिलांनी दूर राहण्याचे आव्हान केले. या कार्यक्रमाला रिपब्लिकन पक्षाचे कामगार आझाडीचे राज्याचे सचिव सूर्यकांत वाघमारे, कामगार आघाडीचे आरपीआयचे महाराष्ट्राचेअनिलभाऊ मोरे ,किरण गोतारणे,गौतम वाघमारे गितांजली भस्मे , नलिनी चव्हाण,रंजना फुलवर , पल्लवी नाईक,प्रतिमा परदेशी , संध्या शिंदे,सुखदेव तागड तसेच आरपीआय कामगार आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.




# खोपोलीत रंगली खोपोली युथ नाईट; सौंदर्य सेलिब्रिटी व मनोरंजनाची बहार

## सांस्कृतिक जीवन समृद्ध करणारा सोहळा-सुधाकर भाऊ घारे

**दैनिक युवक आधार**

**खोपोली वार्ताहर-**1 फेब्रुवारी 2025 रोजी खोपोली, जनता विद्यालय येथिल सुंदर रोषणाई मधील युथ नाईट मध्ये सौंदर्य सेलिब्रिटी व संगीत,फैशन परिधान पोशाख करून सुंदर अश्या मनोरंजनाची बहार असलेली संध्या अगदी दिमाखदार पध्दतीने जल्लोषात पार पडली. या कार्यक्रमाचे आधारस्तंभ सुधाकर भाऊ घारे यांनी समाजाच्या सर्व स्तरावरचा सहभाग एकत्रित उभा करण्यासाठी अशा विविध संकल्पनेतून वेगवेगळ्या विषयांवर संघटित बळांवर कार्यक्रम राबविले पाहिजे व त्यासाठी सर्वांचं सहकार्य असावे असे प्रतिपादन केले.युथ वर्गाने शायनिंग स्टारच्या पोशाखात ज्युनियर प्रिन्स/ ज्युनियर प्रिन्सेस, प्रिन्स ऑफ खोपोली ,प्रिन्सेस ऑफ खोपोली, क्वीन ऑफ खोपोली अशा एक न अनेक स्पर्धेत सहभागीत कार्यक्रमाची सुंदर अशी रूप रेखा आखली होती. उत्साह , आनंदात आपल्यातील कलागुणांना व्यासपीठ मिळाल्याचा आनंद यावेळेस युवकांच्या चेहऱ्यावर पाहायला मिळाला. या स्पर्धेत मोठया संख्येने स्पर्धकांनी सहभाग घेत विविध पारितोषिक सन्मानचिन्ह मिळवले.यावेळी या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे सिनेतारिका मराठी फेम अभिनेता अभिनय सावंत , फेम अभिनेत्री स्मिता गोंडकर तसेच अन्य कला सामाजिक ,राजकीय ,क्षेत्रातील मान्यवरांनी युथ वर्गाचे प्रोत्साहन वाढवण्यासाठी उपस्थिती दाखवली. या कार्यक्रमाला सुधाकर भाऊ घारे फाउंडेशनच्या व्यवस्थापक मंडळाने व तरुण पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यशस्वी करण्यासाठी मोठी मेहनत घेतली होती.




# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण सोहाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**-रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या वेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले, तर वर्षभरात प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, शकुंतला ठाकूर, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, स्कूलचे चेअरमन परेश ठाकूर, 'रयत'चे रायगड विभागीय निरीक्षक मोहन कोंगरे, सहाय्यक निरीक्षक भानूदास खटावकर, स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर स्कूल कमिटी सदस्य निलेश खारकर, कविता खारकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, विद्यार्थी, उपस्थित होते. मान्यवरांनी बहुमोल मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाची थीम मूल्योत्सव अशी होती. या अंतर्गत शैक्षणिक मूल्ये, शिस्तप्रियता, वक्तशीरपणा, स्वच्छतेचे महत्त्व, शाळेविषयी प्रेम, स्त्री-पुरुष समानता, मोठ्यांचा आदर, ध्येयनिश्चिती अशा विषयांवर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केली. शैक्षणिक वर्ष 2024-25मध्ये विविध विषयांत प्राविण्य मिळविलेले विद्यार्थी; त्याचप्रमाणे क्रीडा क्षेत्रात, वक्तृत्व स्पर्धेत चमकदार कामगिरी बजावणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले, तर विशेष स्पर्धेत सहभागी झालेल्या पालकांचेही कौतुक केले गेले.




================

# एसटीच्या नांदेड आगारात कामगार-कर्मचाऱ्यांकडून शिकाऊ उमेदवारांचा निरोप समारंभ

**दैनिक युवक आधार**

**नांदेड वार्ताहर**- औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून विविध ट्रेड उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना एसटी महामंडळाने शिकाऊ उमेदवार (अप्रेन्टीससिप) म्हणून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागीय कार्यशाळेकडून (एसटी वर्कशॉप) नांदेड यांच्या मार्फत (एसटी डेपो) नांदेड आगार येथे एक वर्षाच्या कालावधीसाठी 36 शिकाऊ पाठविलेले उमेदवार प्रशिक्षणार्थी कार्यरत आहेत. त्यापैकी 18 शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थींचा एक वर्षाचा कालावधी 31 जानेवारी 2025 शुक्रवार रोजी पूर्ण झाल्यामुळे एसटी डेपो नांदेड आगारातील कामगार कर्मचाऱ्यांच्या वतीने दि.1 फेब्रुवारी 2025 शनिवार रोजी रा.प.म.नांदेड आगारात त्यांचा आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते पुष्पहार, शाल, प्रत्येकी टिफिन डब्बा भेट देवून सत्कार करून शुभेच्छा रूपी निरोप देण्यात आला.यामध्ये शिकाऊ उमदेवार ओंकार मॅकलवाड, अनिकेत सोनटक्के, मोहम्मद युसूफ, सय्यद फरीद, विशाल लोकरे, शेख अदनान, आवेस खान यांचा समावेश होता. यावेळी आगार व्यवस्थापक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, या सर्वच शिकाऊ उमेदवारांनी वर्षभरात चांगले काम केले असून याचा फायदा भविष्यात त्यांना नक्कीच कामी येईल, असे प्रतिपादन केले.यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक श्रीनिवास रेणके, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड , पाळी प्रमुख मनोहर माळगे, अविनाश भागवत, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, वाहन परिक्षक नामदेव राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. या निरोप समारंभ कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन गुणवंत एच.मिसलवाड यांनी करून आपले विचार मांडले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, एसटी महामंडळामध्ये चालक, वाहक, यांत्रिक, विभागात काम करणारे हे कामगार-कर्मचारी प्रतिकुल परिस्थितीमध्ये कुठेही आपल्या कर्तव्यात तग धरून कमी पडत नसतात, असे प्रतिपादन केले. प्रमुख वक्ते म्हणून ते पुढे बोलताना आपल्या भाषणात म्हणाले की, आज एक वर्षाचा एसटीतील कामाचा अनुभव या शिकाऊ उमेदवारांना भविष्यात त्यांच्या जीवनात औद्योगिक क्षेत्रात, आस्थापनेत या कार्य अनुभवाचा लाभच होईल, असे बोलून एसटी मधील वर्षभरात यांनी मोलाचे योगदान दिले आहे असेही ते यावेळी म्हणाले.याप्रसंगी रा.प.म. आगारातील कामगार-कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.



# पत्रकार हमीदखान पठाण गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित




**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)**- पाटोदा तालुक्यात पत्रकारिता क्षेत्रात नेत्रदिपक काम कलेले पत्रकार हमीदखान पठाण यांना शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा मा.आ.भिमराव धोंडे यांच्या आई वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणारा गंगाई - बाबाजी आदर्श पत्रकारिता पुरस्कार मा.भिमराव धोंडे आणि सिने अभिनेत्री कल्याणी चौधरी यांच्या हस्ते प्रदान केला. हमीदखान पठाण पत्रकारिताच्या माध्यमातून यांनी लोक सहभागातून दुष्काळात शुध्द पिण्यासाठी पाणी वाटप, कोवीड १९ मध्ये किराणा, असंघटित कामगारांसाठी वेळोवेळी आवाज उठवून कामगारांना शासकीय मदत मिळून देणे, सोबत भ्रष्टाचार निर्मूलन समिती, माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ तालुकाध्यक्ष असल्याने वेळोवेळी भ्रष्टाचारा विरुद्ध आवाज उठवून भ्रष्टाचार कमी करण्याचा प्रयत्न, १५ वर्षापासून हमीदखान पठाण यांनी गेल्या पंधरा वर्षांपासून पाणी, अन्न, आरोग्य, शैक्षणिक असे विषयांमध्ये केलेल्या कामाची दखल घेऊन त्यांना गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारामुळे विविध क्षेत्रातील नामवंतांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# संगीत सभेत रायगडचे सुपुत्र पं. उमेश चौधरी यांनी केले रसिकांना मंत्रमुग्ध

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** -जगविख्यात तबलावादक पंडित सदाशिव पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त सदाशिव अकॅडमी ऑफ म्युझिक यांच्यावतीने संपन्न झालेल्या एक दिवसीय संगीत सभेत रायगडचे सुपूत्र पं. उमेश चौधरी यांनी आपल्या गायन कलेतून रसिकांना मंत्रमुग्ध केले. या समारंभाला रसिकांचा उत्स्फूर्त लाभला. हा कार्यक्रम अत्यंत सुरेल आणि भक्तिरसात न्हाहून गेला होता.डोंबिवली येथील गणपती मंदिर वक्रतुंड सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या प्रारंभी कै. पं. सदाशिव पवार यांच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांनी पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर रायगड भूषण पं. उमेश चौधरी यांच्या हाती कार्यक्रमाची सूत्र देण्यात आली. त्यांनी 'राग पुरिया धनाश्री' मधील बडा खयाल लयकारी अंगाने सुसूत्रप्रमाणे राग विस्तारित केला. त्यानंतर छोटा खयाल व तराणा विशेष तयारीने पेश केला. व मैफलीच्या शेवटी भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांच्या 'आता कोठे धावे मन' हा प्रसिद्ध अभंग सादर करून रसिकांची वाहवा मिळवत त्यांची मने जिंकली. या मैफिली नंतर रसिकांना




टाळी धरण्यास भाग पाडले ते म्हणजे पं. रूपक पवार यांच्या तबला सोलो वादनाने. त्यांनी ताल तीनतालमध्ये उस्ताद जाकीर हुसेन यांच्या काही बंदिशी सादर करून त्यांनीही श्रोत्यांची वाहवा मिळवली. त्यांना लेहरा साथ विनोद पडघे यांनी केली. कार्यक्रमाच्या शेवटी ज्येष्ठ गायिका डॉ. पौर्णिमा धुमाळ यांनी राग 'दुर्गा' मधील बडा आणि छोटा खयाल व राग 'बसंत' मधील "फगवा ब्रिज देखन" हा छोटा खयाल सादर करीत " ज्ञानदेव गुरु ज्ञानदेव तारू" हा सेनामहाराजांचा अभंग गाऊन श्रोते भक्तीरसात न्हाऊन निघाले. नित्यक्रमाला तबल्यावर पं. निषाद पवार व पं. विनायक नाईक तर हार्मोनियमवर मंदार दीक्षित यांनी उत्कृष्ट साथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचान नीता रामतीर्थे यांनी तर ध्वनी मुद्रण सुनील म्हात्रे यांच्या अनुष्का रेकॉर्डिंग स्टुडिओने केले.

# सिद्धिविनायक गणेश मंदिरास 21 खुर्च्या अर्पण

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण रायगड**- भारतीय संस्कृतीत परंपरा ह्या सण आणि उत्सव यामुळे टिकून आहेत. ह्या उत्सवात उत्स्फूर्तपणे लोक हे एकत्र येत असतात आणि एकमेकांच्या विषयी आपुलकी ने चर्चा करतात.सुख दुःख हे जाणून घेत असतात.भारतीय संस्कृतीक परंपरा ही महान आहे. गणेश गणपती गजानन अश्या अनेक नावांनी गणला जाणारा सर्वांचा लाडका गणराय सर्व गणेश भक्तांच्या हाकेला पावणारा हा गणराज आज माघी गणेशोत्सव संपूर्ण भारत वर्षांमध्ये मोठ्या उत्साहामध्ये साजरा केला जातो. आवरे गावांमध्ये प्रसिद्ध अश्या सिद्धिविनायक मंदिरामध्ये सुद्धा सदर उत्सव हा अगदी पारंपरिक पद्धतीने व मोठ्या उत्साहात साजरा केला जातो या मध्ये मंदिरात गणेश भक्तांची मांदियाळी येत असते आणि सर्वांच्या हाकेला



नवसाला पावणारा आवरे गावचा सिद्धिविनायक गणपती अशी सर्व पंचक्रोशीत ख्याती आहे प्रत्येक गणेश भक्त हा गणेशाच्या चरणी माथा ठेवल्याशिवाय पुढचा प्रवास करत नाहीत म्हणजे गणेशावर असणारी गणेश भक्ताची अतूट श्रद्धा दिसून येते आणि या गणेश भक्तापैकी आवरे गावातील थोर समाजसेवक शिवकुमार म्हात्रे हे दरवर्षी या गणेशाच्या चरणी काहीतरी भेट ही अर्पण करत असतात याही वर्षी त्यांनी हा संकल्प पूर्ण केला कै.आनंदी अनंत म्हात्रे, कै.गुलाब गणपत ठाकूर कोटनाका उरणयांच्या स्मरणार्थ शिवा म्हात्रे परिवारा कडून 21 खुर्च्या सिद्धिविनायक मंदिरास अर्पण केलेले आहेत. या मंदिराचे सदस्य सभासद यावेळी उपस्थित होते. आणि या मंदिर कमिटीचे अध्यक्ष गणपत नाग्या म्हात्रे, अनंत नाग्या म्हात्रे निवास गावंड सर डी ए गावंड सर अशोक म्हात्रे सर एम के म्हात्रे एम एस म्हात्रे सर विनायक म्हात्रे सर भगत सर संदीप गावंड हे मान्यवर तसेच समस्त मंदिर कमिटीचे सदस्य यांच्या उपस्थितीत सदर खुर्च्या या मंदिरास अर्पण केल्या या गणेशावर असणारी श्रद्धा थोर समाजसेवक शिवकुमार म्हात्रे यांची औदार्य हे दिसून येते शिवकुमार म्हात्रे यांनी याआधीच सामाजिक शैक्षणिक व गोरगरिबांना अन्नदान तसेच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणजे एस एस सी व एच एस सी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर आपल्या तीन चाकी वाहनातून मोफत असा प्रवास ही योजना राबवित असतात तसेच अनेक माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत शिवकुमार म्हात्रे यांचा यातून औदार्य दिसून येत आहे सदर प्रसंगी असंख्य असे गणेश भक्त हे उपस्थित होते.



# कार मोटार सायकल आपघातात तीन जखमी

**दैनिक युवक आधार**

**प्रशांत तांबोळकर/शिरूरआनंतपाळ** :उदगीर नळेगाव मार्गावरील डिगोळ गावाजवळ कार व दुचाकी याच्यात झालेल्या भीषण अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले. दोन्ही वाहनांची जोरदार टक्कर झाल्याने मोटारसायकलीचा चक्काचूर झाला आहे. मोठा आवाज झाल्याने मदतीसाठी डिगोळ येथील नागरिक धावून आले.रविवारी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास उदगीर नळेगाव मार्गावरील डिगोळ गावच्या जवळ हा अपघात झाला. मोटारसायकल (एम. एच. ५५ / १५२६ व चारचाकी कार क्रमांक एम. एच. २४ / ए.डब्ल्यु ९३९० या दोन वाहनांमध्ये समोरासमोर भीषण आपघात झाला. या अपघातात मोटरसायकल वरील तरुण किरण तानाजी घोडके वय २४, समीर कमरोद्दीन पठाण वय २५ व विष्णु व्यंकट ढगे वय २२ सर्व रा.हेर ता.उदगीर हे गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी उदगीर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. अपघाताची माहिती प्राप्त होताच घटनास्थळी शिरूरआनंतपाळ पोलीस स्टेशनचे बीट जमादार शिवकुमार बिराजदार यांनी जखमीनी अंबुलन्स न आल्याने एका खाजगी टेंम्पोने रुग्नालयात पाठवीले. हायवे रोड असल्याने व या ठिकाणी जखमीना पहाण्यासाठी नांगरिकाची मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पोलीस बीट जमादार यांनी वहाने हटवुन आल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.




# दिव्यातील आदर्श विद्यालय शाळेत फूड फेस्टिव्हल संपन्न

## विद्यार्थ्यांनी बनवले वेगवेगळ्या पद्धतीचे खाद्य पदार्थ

**दैनिक युवक आधार**

**ठाणे वार्ताहर**-आदर्श विद्यालयात खाद्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दिवा येथील आदर्श शाळेतर्फे शनिवारी खाद्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी आपली कलागुण दाखवून विविध पदार्थ तयार केले. ज्याचे शाळेतील शिक्षक व पालकांनी भरभरून कौतुक केले. दिवा पूर्व येथील बी.आर.नगर जवळील आदर्श विद्यालयाने शिक्षण क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या माध्यमातून वेळोवेळी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण होईल, असे शाळेचे विश्वस्त व मुख्याध्यापक अमित मिश्रा यांनी सांगितले की, फूड फेस्टिव्हलमध्ये विद्यार्थ्यांकडून पदार्थ तयार करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अमित मिश्रा व स्मिता पाटील, शशिधर चतुर्वेदी, सपना शुक्ला व प्रियंका मांडवकर यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.फूड फेस्टिव्हलच्या यशस्वी आयोजनानंतर मुख्याध्यापकांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचे आभार व्यक्त करून अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबनाची भावना निर्माण होते व विद्यार्थी आत्मनिर्भर होऊन कार्यकुशल बनतात असे त्यांनी बोलताना स्पष्ट केल तसेच पालकांनीही विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे कौतुक केले उशिरा पर्यन्त उपक्रमाची रेलचेल सुरु होती.

